(9)



मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या बुधवार दिनांक २८ जुलै १९८३ रोजी संपन्न झालेल्या ९ व्या बैठकीच्या स्थायी करण्यांत आलेला कार्यवृत्तांत.

Confirmed in the 10th meeting on 2[illegible]/8/83.

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

बुधवार दिनांक २८ जुलै १९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बुधवार दिनांक २८ जुलै १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९ वी बैठक गृहनिर्माण भवनाच्या ३-या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] डॉ. शंकरराव मटकर. | सभापती |
| २] श्री. हेमराज शहा. | उप सभापती |
| ३] श्री. पं. दो. वाणी. | मुख्य अधिकारी |
| ४] श्री. यादवराव कांबळे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग. | सदस्य |
| ५] श्री. पोतदार, प्रमुख अभियंता, मुंबई महानगर पालिका यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ६] श्री. रॉकी फ्रास्टो. | सदस्य |
| ७] श्री. विवेक भर्तू. | सदस्य |
| ८] श्री. महम्मद फारुख मन्सूरी. | सदस्य |
| ९] श्री. व्हि. बी. वरसकर. | सदस्य |
| १०] श्री. शंकरराव पिटला | सदस्य |
| ११] श्री. गजेंद्र लष्करी. | सदस्य |
| १२] श्री. श्रीकांत पाटील. | सदस्य |
| १३] श्री. चेतन शहा. | सदस्य |
| १४] श्री. कमलाकर शर्मा | सदस्य |
| १५] श्री. महंमद आजम खान | सदस्य |
| १६] श्री. प्र. म. कांजरोलकर उप करनिर्धारक व संकलक मुंबई महानगर पालिका. | निमंत्रित |

मा. सभापती डॉ. शंकर वामन मटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. प्रारंभी मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे स्वागत करण्यात आले.

बाब क्र. ९.१

विषय : दिनांक २४ जून १९९३ रोजी झालेल्या मंडळाच्या ८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

पृष्ठ क्र. १ ते २७ वर मंडळाच्या ८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. विवेक भर्तू, सदस्य यांनी सांगितले की, काही पुनर्रचित इमारतीमध्ये अनिवासी गाळे कमी आहेत तर काही इमारती पुन्हा बांधल्या जाऊ शकणार नाहीत. अशा अनीवासी रहिवाश्यांना सामावून घेण्यासाठी पुनर्रचित इमारतीत अतिरिक्त अनिवासी गाळे बांधण्याची आवश्यकता असल्याविषयीचा मुददा गेल्या बैठकीत मांडला होता, परंतु त्याचा उल्लेख कार्यवृत्तांतामध्ये नाही. या विषयावर चर्चा झाली. मुंबई महानगर पालिकेच्या प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की प्रचलित धोरणानुसार जुन्या इमारतीमधील अनिवासी गाळ्या पेक्षा अधिक अनिवासी गाळे नविन इमारतीत बांधता येत नाहीत. यावर सर्व सदस्यांनी प्रतिपादन केले की पाडण्यांत आलेल्या इमारती मधील अनिवासी गाळे धारकांना नवीन इमारतीत सामावून घेणे मंडळास बंधनकारक असल्यामुळे मुंबई महानगर पालिकेच्या धोरणात बदल होणे आवश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, पाडण्यांत आलेल्या इमारतीमधील किती अनिवासी गाळेधारकांना अद्याप पुनर्रचित इमारतीत गाळा मिळालेला नाही. याची यादी तयार करून या गाळेधारकांना सामावून घेण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून सध्याच्या धोरणात बदल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. कार्यवृत्तांतात वरील चर्चेचा उल्लेख करण्यात यावा असा निर्णय घेण्यांत आला.

सविस्तर चर्चेअंती वरील सुधारणेसह दि. २४ जून १९९३ रोजी झालेल्या मंडळाच्या ८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

बाब क्र. ९.२

विषय :- अनुपालन अहवाल.

पृष्ठ क्र. २९ ते ४९ वर सादर केलेल्या अनुपालन अहवाला-

वर चर्चा झाली. श्री. कमलाकर शर्मा यांनी प्रश्न विचारला की दंगलीमध्ये व बॉम्बस्फोटात हानी पोहोचलेल्या इमारतींच्या दुरुस्ती खर्चाच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला, याबाबतची माहिती सभागृहाला देण्याची विनंती केली. श्री. यादवराव कांबळे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय यांनी खुलासा केला की, या खर्चाच्या पूर्ततेसंबंधी शासनाने प्रस्ताव तयार केला असून मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर सदर निर्णय कळविण्यात येईल.

सर्वश्री हेमराज शहा व शंकरराव पिटले यांनी निदर्शनास आणून दिले की प्रत्येक विभागातील ५ नवीन कामे व ५ जुनी कामे सदस्यांना दाखविण्याचा निर्णय झाला असताना जुलै ९३ मध्ये सदस्यांना कामे दाखविण्यात आली नाहीत. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी सकाळी साधारणपणे ११ वाजता कामाच्या पहाणीचा कार्यक्रम निश्चित करावा व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

पृष्ठ क्र. २९ एफ. वर सादर केलेल्या दिनांक १२.७.९३ च्या पत्राच्या संदर्भात म्हणजेच दुरुस्ती उपकरात वाढ करण्याच्या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला याची माहिती देण्याची विनंती श्री. विवेक भर्तू यांनी केली. श्री. यादवराव कांबळे, उपसचिव यांनी खुलासा केला की, सदर प्रस्तावावर शासनातर्फे कार्यवाही सुरु असून साधारणपणे पुढील बैठकीत यासंबंधीच्या निर्णयाची माहिती देण्यात येईल.

रस्त्यावरील घनकचरा [डेब्रीज] उचलण्याच्या संदर्भात तातडीने कार्यवाही केल्याबद्दल संबंधित अभियंत्यांना श्री. गजेंद्र लष्करी यांनी धन्यवाद दिले.

बाब क्र. ९.३

विषय :- "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे.

१] भूकर पहाणी क्र. ३७०, गिरगांव विभाग येथील "पिंपळवाडी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव.

गेल्या बैठकीत बाब क्र. ८.२ अन्वये सदर प्रस्ताव चर्चेसाठी घेतला असता सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे ९ व्या बैठकीत निर्णय द्यावा असे ठरले होते. त्यामुळे आजच्या बैठकीत हा विषय पुन्हा चर्चेसाठी ठेवला होता. न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थितीची

२०

७

माहिती करून घेण्यासाठी उपविधी सल्लागार/प्राधिकरण यांना बैठकीत निमंत्रित करण्यात आले होते. श्री. गोडसे, उपविधी सल्लागार/प्राधिकरण यांनी खुलासा केला की सदर मालमत्तेच्या मालकाने पुनर्विकासासाठी परवानगी मिळावी यासाठी उच्च न्यायालयात रीट पिटीशन क्र. ६२५/८९ अन्वये दावा दाखल केला होता. न्यायालयाने सदर दावा फेटाळून लावला असून या जमिनीवर प्राधिकरणाने भूसंपादनाची कार्यवाही ग्राह्य ठरविली आहे. व या निर्णयावर अपील करण्यासाठी ८ जुलै १९९३ पर्यन्त मुदत दिली होती. घरमालकाने अपील सादर केले असून त्यासंदर्भात न्यायालयाने कोणतेही स्थगनादेश दिलेले नाहीत. त्यामुळे या विषयावर मंडळास निर्णय घेण्यास हरकत नाही असे मत उपविधी सल्लागार/प्रा. यांनी दिले. तसेच मुख्य अधिकारी यांनी विधी सल्लागार/प्रा. यांचेशी दूरध्वनीवरून चर्चा केली व विधी सल्लागार/प्राधिकरण यांनीही वरीलप्रमाणे निर्णय घेण्यास हरकत नसल्याचे सांगितले.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की या जमिनीवर मंडळाने पुनर्बांधणी योजना राबविल्यास गिरगांव सारख्या मध्यवर्ती भागात सुमारे ५०० अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील. जेणेकरून दक्षिण मुंबईतील ज्या इमारतींची पुनर्बांधणी करणे शक्य नाही, अशा इमारतीमधील रहिवाश्यांना या ठिकाणी सामावून घेता येईल. श्री. शंकरराव पिटला यांनी माहिती दिली की येथील बहुतेक इमारती अगोदरच पाडलेल्या असून इमारती रिकामी करण्याच्या दृष्टीने अडचण येणार नाही व योजना लवकरच कार्यान्वित करता येणे शक्य होईल. सविस्तर चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की सदर जमिनीवर मंडळातर्फे पुनर्बांधणी योजना राबविण्यात यावी.

ठराव क्रमांक ९.५५

भूकर पहाणी क्र. ३७०, गिरगांव येथील "पिंपळवाडी" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या जमिनीवर मंडळातर्फे पुनर्बांधणी योजना राबविण्यात यावी असा एकमताने निर्णय घेण्यात आला.

बाब क्र. ९. ३. २

पृष्ठ क्र. ५१ वर अंतिम भूखंड क्र. ४५३ नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग इमारत क्र. ११० भवानी शंकर मार्ग, दादर येथील "पोंट मॅग्ज मॅडिनी" या नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्र. ९. ५६

अंतिम भूखंड क्र. ४५३ नगर रचना योजना क्र. ४ माहिम विभाग इमारत क्र. ११० भवानी शंकर मार्ग दादर, येथील पोंट मॅग्ज मॅडिनी या नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक : ९. ३. ३

भूकर पहाणी क्रमांक ७२२/१० माटुंगा विभाग, भूखंड क्रमांक ५६८ दादर माटुंगा इस्टेट, लेडी जमशेदजी रोड, माटुंगा, मुंबई येथील " नवरोज विला " या नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी 9.33 (११.३३) चटई क्षेत्र निर्देशांकाने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक ५९ वर सादर केला आहे. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. श्री. चेतन शाहा यांनी मुद्दा उपस्थित केला की, या प्रकरणी चटई निर्देशांक २.०० पूर्णपणे का वापरला जात नाही, यावर श्री. यादवराव कांबळे, उपसचिव यांनी खुलासा केला की, सदर मालमत्ता हेरिटेज इमारतींच्या यादीत समाविष्ट केलेली असून हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीने नियोजित इमारतीत तळ + ७ मजले बांधण्यास परवानगी दिलेली आहे. त्या आधारे मुंबई महानगरपालिकेने आराखडयास मंजूरी दिलेली असून शासनानेही सदर प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. यावर

श्री. चेतन शाहा यांनी मुद्दा उपस्थित केला की, हेरिटेज कमिटीने यापूर्वी २.०० चटई क्षेत्रफळास मंजूरी दिलेली आहे. २.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरल्यास या योजनेतील काही गाळे मंडळास उपलब्ध होवू शकतील. असे मत श्री. चेतन शाहा यांनी व्यक्त केले. या मुद्यावर चर्चा होवून श्री. चेतन शाहा यांचे मत शासनास कळवावे, असे ठरले. या विषयावर सविस्तर चर्चेअंती बैठकीपुढे सादर केलेल्या प्रस्तावानुसार "नवरोज़ विला" या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचा निर्णय ..... घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ९.५७

भूकर पहाणी क्रमांक ७२२/१० माटुंगा विभाग, भूखंड क्रमांक ५६८ दादर माटुंगा इस्टेट, लेडी जमशेदजी रोड, माटुंगा, मुंबई येथील "नवरोज विल्ला" या नांवाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी १.३३चटईक्षेत्र निर्देशांकाने " ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

बाब क्रमांक : ९.३.४

भूकर पहाणी क्रमांक २/९३९ फोर्ट विभाग इमारत क्र. २०१ डॉ. डी. एन. रोड येथील वेलिंग हाऊस या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ७३ वर सादर केला आहे. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती या प्रकरणी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ९.५८

भूकर पहाणी क्र. २/९३९ फोर्ट विभाग इमारत क्र. २०१ डॉ. डी. एन. रोड येथील वेलींग हाऊस या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यांचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

बाब क्रमांक : ९.३.५

भूकर पहाणी क्रमांक १८८२ भायखळा विभाग इमारत क्र. ३५ डॉ. आनंदराव नायर मार्ग, आग्रीपाडा "ई" विभाग या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक ८३ वर सादर केला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती सदर प्रकरणी मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ९.५९

भूकर पहाणी क्रमांक १८८२ भायखळा विभाग इमारत क्रमांक ३५ डॉ. आनंदराव नायर मार्ग "ई" विभाग या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ९.३.६

भूकर पहाणी क्रमांक ४/८३० लोअर परळ विभाग इमारत क्र. १७ डी. ई. एफ. जी. एच. ना. म. जोशी मार्ग, हाजी कासम चाळ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ९१ वर सादर केला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. या संदर्भात हाजी कासम चाळ समितीचे दिनांक २८.७.९३ चे सर्व रहिवाश्यांच्या सह्या असलेले निवेदन सादर केले. या निवेदनात घरमालकाने पुनर्विकास योजनेद्वारे पुढील सुविधा देण्याचे मान्य केले आहे.

[१] समाज मंदीर

[२] इलेक्ट्रिक सब स्टेशन

[३] रहिवाश्यांना वाढीव क्षेत्रफळ.

सदस्यांनी प्रस्तावात पुढीलप्रमाणे त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून दिले.

[१] रहिवाश्यांच्या यादीत दोन रहिवासी कमी दाखविले आहेत.

[२] बी व सी वर्गातील इमारतीच्या संदर्भात अपुरी माहिती आहे.

[३] गॅरेजचा उल्लेख केलेला नाही.

याप्रकरणी सदस्यांच्या समितीने या मालमत्तेच्या जागेची व इमारतींची पहाणी करून निर्णय घ्यावा असे सूचित करण्यात आले. यावर उपसचिव श्री. यादवराव कांबळे यांनी आक्षेप घेतला. त्रुटींची पूर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे ही जबाबदारी संबंधित अभियंत्यांची असल्यामुळे याप्रकरणी सदस्यांनी इमारतीस भेट देण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. यावर सदस्यांनी असे सांगितले की, घरमालकाने रहिवाश्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता कोणत्या प्रकारे केली जाणार आहे याचा प्रस्तावात उल्लेख नाही.

मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सदस्यांच्या सर्व शंकाचे निरसरण करण्यात येईल. सविस्तर चर्चेअंती सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा विचार करून परिपूर्ण प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असा निर्णय घेण्यात आला.

बाब क्रमांक : ९.४

विषय :- "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतीमधील गाळेधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भू संपादनाचे प्रस्ताव.

मुंबई विविध भागांतील उपकरपात्र इमारतीमधील गाळेधारकांनी म्हाडा अधिनियम १०३ ब मधील तरतुदीनुसार सादर केलेले भूसंपादनाचे ६ प्रस्ताव पृष्ठ क्र. ११७ ते १७७ वर मंडळाच्या मंजूरीसाठी सादर केलेले आहेत.

या संदर्भात श्री. चेतन शाह यांनी विचारणा केली की, आतापर्यंत मंडळाने मंजूरी दिलेल्या भूसंपादन प्रस्तावांच्या संदर्भात पुढे काय कार्यवाही झाली याची सदस्यांना कल्पना नाही. या प्रस्तावांच्या भूसंपादन कार्यवाहीत लागणाऱ्या विलंबाविषयी योजनेत सहभागी झालेले भाडेकरु तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत. या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. कार्यकारी अभियंता सहकारी संस्था कक्ष यांनी माहिती दिली की, आतापर्यंत मंडळाने १२६ प्रस्तावांना मंजूरी दिलेली असून त्यापैकी १०१ प्रस्तावांना शासनाने मंजूरी दिली आहे. यापैकी ८ प्रस्तावांच्या संदर्भात भूसंपादन कार्यवाही पूर्ण होवून २ संस्थांचे पंजीकरण झाले आहे. भूसंपादनाच्या कार्यवाहीचा वेग अत्यंत धीमा असल्याविषयी सदस्यांनी टीका केली. उपसचिव श्री. यादवराव कांबळे यांनी खुलासा केला की, या कायद्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द घरमालक संघटनेने सर्वोच्च न्यायालयात अपील केले आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालय कोणता निकाल देईल याचा अंदाज नसल्यामुळे या प्रस्तावांच्या संदर्भात मंजूरीची कार्यवाही मंद गतीने सुरु ठेवलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय साधारणपणे ऑगष्ट १९९३ मध्ये अपेक्षित आहे. या निर्णयानंतर या प्रकरणाच्या कार्यवाहीस योग्य ती गती देता येईल. सदस्यांनी सूचना केली सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापर्यंत आज सादर केलेले प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात यावेत. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार या प्रस्तावांच्या संदर्भात भूसंपादनाची सर्व कार्यवाही पूर्ण करण्याबाबत बाधा येत नाही. त्यामुळे प्राप्त झालेले प्रस्ताव प्रलंबित ठेवणे उचित ठरणार नाही. मुख्य अधिकारी यांनी सभागृहास अशीही माहिती दिली की, याप्रकरणी भूसंपादन कार्यवाही अधिक

(292)

१९

प्रभावीपणे व वेगाने व्हावी यासाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिनांक १९.६.९० रोजी संबंधितांची बैठक आयोजित करून कार्यवाहीच्या संदर्भात परिपत्रकाद्वारे संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, कार्यकारी अभियंता, सहकारी संस्था कक्ष यांनी विशेष भूसंपादन अधिकारी यांचेशी चर्चा करून भूसंपादन कार्यवाहीच्या प्रगतीचा तपशिल तसेच प्रलंबित प्रकरणी भूसंपादन कार्यवाही लवकरात लवकर कशी पूर्ण करता येईल. यासंबधीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा. चर्चेअंती सादर केलेल्या सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : ९.४.१

गोखले रोड, दादर येथील ४९.५० श्रीलक्ष्मी सदन या इमारतीमधील गाळेधारकांनी सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ११७ वर सादर केला आहे. सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ९.६०

४९-५० श्रीलक्ष्मी सदन सहकार निवास या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या गोखले रोड [उत्तर] दादर, जी [उत्तर] विभाग येथील भूखंड व त्यावरील इमारती नियोजित श्रीलक्ष्मी सदन सहकार निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भूसंपादनाच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ९.४.२

मंगला भुवन, डॉ. देशमुख लेन, व्ही.पी. रोड या इमारतीमधील गाळेधारकांनी सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १३१ वर सादर केला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

29

ठराव क्रमांक : ९.६१

मंगला भुवन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारत क्रमांक ११/१३ डॉ. देशमुख लेन, व्ही.पी. रोड, डी. विभाग येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित श्रीनाथकृपा सहकारी संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ९.४.३

सर भालचन्द्र मार्ग, माटुंगा येथील साठे बिल्डिंग या इमारतीमधील गाळेधारकांनी सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १३९ वर सादर केलेला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावास मंजूरी देण्याचा निर्णय झाला.

ठराव क्रमांक : ९.६२

साठे बिल्डिंग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्लॉट क्र. २२३ वर भालचंद्र मार्ग एफ [उत्तर] विभाग माटुंगा येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित साठे बिल्डिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ९.४.४

रेगी हाऊस, लेडी जमशेदजी मार्ग माहिम, या इमारतीमधील गाळेधारकांनी सादर केलेले भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १४९ वर सादर केला आहे. यावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावास मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ९.६३

इमारत क्र. ५५, रेगी हाऊस लेडी जमशेदजी मार्ग, माहिम, मुंबई-१६ येथील भूखंड व त्यावरील इमारती नियोजित रेगी हाऊस सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ९.४.५

सूर्यमहाल वासुदेव पैडणेकर मार्ग नायगांव, मुंबई - १४ येथील गाळेधारकांनी सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक १५९ वर सादर केला आहे. सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक : ९.६८

इमारत क्रमांक १० सूर्य महाल, वासुदेव पेडणेकर मार्ग, नायगांव, एफ [दक्षिण] विभाग मुंबई- १४ येथील भूखंड त्यावरील इमारतींसह नियोजित सूर्य महाल सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक : ८.४.६

वल्लभदास कानजी बिल्डिंग, खोताची वाडी, गिरगांव या इमारतीच्या गाळेधारकांनी सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १६७ वर सादर केलेला आहे. यावर सविस्तर चर्चा झाली व प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ९.६५

वल्लभदास कानजी बिल्डिंग या ४९/५१ खोताची वाडी, गिरगांव मुंबई- ४, डी विभाग, येथील भूखंड व त्यावरील इमारती नियोजित समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक : ९.५

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याविषयी.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. १७९ ते ३६७ वर सादर केले आहेत. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सर्वश्री शंकरराव पिटला गजेन्द्र लष्करी, कमलाकर शर्मा, श्रीकांत पाटील, फारुख मन्सुरी

या सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. मंजूरी दिल्यानंतर दुरुस्ती कामे सुरू होण्यास विलंब लागतो व कामे पूर्ण होण्यास दीर्घ कालावधी लागतो. याविषयी सदस्यांनी तीव्र टीका केली. श्री. महमंद आझम खान यांनी तक्रार केली की ते रहात असलेल्या २१, १ली धेनाबाई स्ट्रीट या इमारतीचे अंदाजपत्रक मंजूर होवून संबंधित कार्यकारी अभियंता दुरुस्ती काम सुरू करण्यास टाळाटाळ करीत आहेत. या संदर्भात उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी खुलासा केला की, ही इमारत १मजली असल्यामुळे पुनर्रचना विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. आता कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. पृष्ठ क्र. २१३-२१९ वर पर्यंच्या मजल्याचे बांधकाम क्षेत्रफळ नजरचुकीने समाविष्ठ करण्यांत आले नाही असा उल्लेख आहे. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी प्रकरण तपासून पुढील बैठकीत माहिती देण्याचे मान्य केले. पृष्ठ क्रमांक ३१३ वरील प्रस्तावांत दुरुस्ती उपकर कधीपर्यंत भरला याची माहिती दिलेली नाही. श्री. काजरोळकर, उपकरसंचाल., मुंबई महानगरपालिका यांनी पुढील बैठकीत ही माहिती सादर करण्याचे मान्य केले.

पृष्ठ क्रमांक २९५ वर क्षेत्रफळांत २०० चौ.मी. चा फरक असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. या प्रस्तावाचे मूळ कागदपत्रे तपासल्यानंतर टंकलेखनाच्या चुकीमुळे १७९९९ ऐवजी १९९९९ पडले असल्याचा खुलासा करण्यांत आला. मूळ अंदाजपत्रकाची छाननी केल्यानंतर चुकीची दुरुस्ती करण्यांत आली.

मुख्य अधिकारी यांनी या संदर्भात खुलासा केला की, दुरुस्ती कामाची व सुधारीत प्रशासकीय मंजूरी मिळून ५८ अंदाजपत्रके सादर करण्यांत आली आहेत. त्यापैकी वर उल्लेख केलेली दोन अंदाजपत्रके सोडून अन्य ५६ दुरुस्ती अंदाजपत्रकाच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याची विनंती सभागृहास करण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या ५६ अंदाजपत्रकाच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली.

(२११) (२१२)

२७

ठराव क्रमांक : ९.६६

परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या ५६ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : ९.६

दक्षिण परिमंडळातील इमारतींच्या दुरुस्तीवर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चाबाबत टिप्पणी.

१] इमारत क्रमांक १० शामराव विठ्ठल मार्ग [किल्ला लेन] डी-२ विभाग, पृष्ठ क्र. ३६९

२] इमारत क्रमांक ५, दिनबाई पेरीट स्ट्रीट, डी-२ विभाग, पृष्ठ क्रमांक ३७५.

ठराव क्रमांक : ९.६७

वरील बाब क्रमांकांतर्गत [१] इमारत क्रमांक १० शामराव विठ्ठल मार्ग [किल्ला लेन] डी-२ विभाग, या इमारतीच्या रुपये ३,१९,३७९ रक्कमेच्या प्रशासकीय मंजूरीपेक्षा रुपये ३०,८४३/- या अधिक झालेल्या रक्कमेच्या खर्चास समितीने मान्यता दिली.

तसेच [२] इमारत क्रमांक ५, दिनबाई पेरीट स्ट्रीट डी-२ विभाग या इमारतीच्या रुपये ६,६६,१५४/- रक्कमेच्या प्रशासकीय मंजूरीपेक्षा रुपये ३८,०५५/- या अधिक झालेल्या रक्कमेच्या खर्चास समितीने मान्यता दिली.

बाब क्रमांक : ९.७

विषय :- म्हाडा अधिनियम ८८[३] अन्वये प्रदान करावयाचे प्रमाणपत्र.

९-११ भंडारी स्ट्रीट ही इमारत म्हाडा अधिनियमा कलम ८८[३] अन्वये घोषित करण्याविषयीचा प्रस्ताव पृ.ठ क्र. ३८१ वर सादर केलेला आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक : ९.६८

९-११ भंडारी स्ट्रीट सी १-२ विभाग इमारत म्हाडा अधिनियम कलम ८८[३] अन्वये दुरुस्तीच्या प्रमाणित खर्चापलिकडील असे प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक : ९.८

पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजूरी देण्याविषयी..

२४२ सी व २४२ डी, आदम मिस्त्री लेन, फ[दक्षिण] विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या सुधारीत प्रशासकीय मंजूरी देण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ३८७ वर मंजूरीसाठी सादर केला आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी प्रस्तावाची सविस्तर माहिती दिली. दि. १०.३.८८ रोजी या योजनेच्या खर्चास रुपये १७५ - प्रति चौ.फूट या ढोबळ दराने रुपये ३६.२० लक्ष एवढया खर्चास तांत्रिक समिती मंजूरी दिली होती. भूसंपादन कार्यवाही पूर्ण होवून १९९२ साली प्रत्यक्ष कामास सुरवात झाली. मध्यंतरीच्या काळात झालेल्या भाववाढीमुळे सुधारीत अंदाजपत्रक रु. ६३.५० लक्ष एवढया खर्चाचे झाले. त्यामुळे या योजनेच्या खर्चात ७५.४१% एवढी वाढ अपेक्षित आहे. खर्चात झालेली वाढ ही प्रामुख्याने भूसंपादन कार्यवाहीस झालेल्या विलंबामुळे झालेली आहे. या संदर्भात उपसचिव श्री. कांबळे, यांनी माहिती दिली की, दरवर्षी होणाऱ्या भाववाढीमुळे सर्व विभागातील

बांधकामाच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजूरी घेणे अपरिहार्य झालेले आहे. चर्चेअंती या योजनेवर होणाऱ्या रू. ६३.५० लक्ष एवढया अंदाजित खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्रमांक ९.६९

इमारत क्र. २४२ सी व डी आदम मिस्त्री लेन, फ/ग/द विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या रू. ६३.५० लक्ष एवढया अंदाजित खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने संमत झाला.

बाब क्रमांक : ९.९

विषय :- पुनर्बांधणी योजनेतील इमारतीच्या नावाचा प्रस्ताव.

नाना बिल्डिंग, डॉ. आंबेडकर मार्ग, परळ या पुनर्रचित इमारतीस "स्वप्नपूर्ती" हे नांव देण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्रमांक ३९७ वर सादर केला आहे. यावर सविस्तर चर्चा होवून प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक : ९.७०

जुनी इमारत " नाना बिल्डिंग" डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ या पुनर्रचित इमारतीस "स्वप्नपूर्ती" हे नांव देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक : ९.१०

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे चर्चेचे विषय.

[१] श्री. शंकरराव पिटले, सदस्य यांनी पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात प्रगतीचा अहवाल, तसेच या योजनेद्वारे मंडळास किती

33

गाळे उपलब्ध झाले याचा तपशिल सादर करण्याची विनंती केली. सदर अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे मान्य करण्यात आले.

मंडळाची १० वी बैठक शनिवार दि. २१ ऑगष्ट १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्याचे एकमताने ठरले.

माननीय सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सभापती,
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्र. मंडळ,
मुंबई.

२ 220



परिशिष्ठ "अ"

दिनांक २८.७.९३ रोजी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ९ व्या बैठकीत उपकर इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी दिलेले प्रस्ताव.

| अ.क्र. | इमारतीचे नांव | विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | **दक्षिण परिमंडळ** | | |
| १. | १९१ एल कॅव्हल क्रॉस लेन.क्र.१. | सी३-४ | १९३ |
| २. | ७ ताडिल स्ट्रीट [उत्तर] | ब | १९५ |
| ३. | २६ अ जमनादास बिल्डींग. दुसरी फणसवाडी. | सी३-४ | २१७ |
| ४. | १६ बोरा स्ट्रीट/५३-५९-५९ अ इर्स्कीन रोड. | सी१-२ | २१९ |
| ५. | ४६-४८ मोदी स्ट्रीट. | अ | २२१ |
| ६. | २८३-२८५ चतुरभुज निवास शामलदास गांधी मार्ग. | सी३-४ | २२३ |
| ७. | २४ निकटवाडी, एस. व्ही. सोहनी पथ. | डी१ | २२५ |
| ८. | ३-११ याकूब स्ट्रीट/२६-२८ अ इब्राहिम रहिमतुल्ला स्ट्रीट. | सी१-२ | २२७ |
| ९. | १९२-२०२ डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग. | डी-२ | [illegible] |
| १०. | १३-१३ अ भाई जिवनजी लेन. | सी३-४ | २६१ |
| ११. | १० पहिली अक्कलकोट लेन पेठे बिल्डींग. | डी१ | २६३ |
| १२. | २७२-२७४-२७६ नागदेवी स्ट्रीट. | ब | २६५ |
| १३. | २३ ई मुलचंद लालजी बिल्डींग. /झावबावाडी | सी३-४ | २६९ |
| १४. | ८४-८६ धनजी स्ट्रीट. | सी१-२ | २७५ |
| १५. | १४९ ई ॲन्ड एच जे. एस. एस. रोड. | डी१ | २७७ |
| १६. | ३-५ रोपा लेन. | सी३-४ | २८१ |
| | **उत्तर परिमंडळ** | | |
| १७. | पालनजी सोसपाल बिल्डींग ओ. ब्लॉक एस. के. बोले मार्ग. | फ/उ | १९७ |
| १८. | २ के खंबाटा लेन. | इ१ | २०१ |
| १९. | ५४७-५४९ ओ. बी. लक्ष्मीसदन एन. एम. जोशी मार्ग | इ२ | २०३ |
| २०. | विद्युत निवास डॉ. एस. बी. राऊत मार्ग. | फ/उ | २०५ |
| २१. | १७१ अ १७१ सी सरदार बिल्डींग, भवानी शंकर रोड. | फ/उ | २०७ |
| २२. | १०६-११० शंकर कुपाल रोड/७२-७४ कामाठीपुरा ५ वी गल्ली. | इ२ | २०९ |

| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| २३. | | ४४–४८, ३३–३७ आणि ९–२१ कामाठीपूरा ११ वी १२ वी गल्ली. | इ२ | २११ |
| २४. | | १४५ लिलिन हाऊस लेडी जमशेठजी मार्ग. | फग/उ | २२९ |
| २५. | | ४१ ई ददक चाळ डॉ. बी. ए. रोड. | इ१ | २३१ |
| २६. | | ३४७ ई वाणी चाळ नाम. जोशी मार्ग. | फग/द | २३३ |
| २७. | | ११० रामभूवन दादासाहेब फाळके मार्ग. | फग/द | २३५ |
| २८. | | २२६ ई राम मॅन्शन एस. के. बोले मार्ग, | फग/उ | २३७ |
| २९. | | ३५–५५ खाडीया स्ट्रीट. | इ२ | २३९ |
| ३०. | | ६९–७३ आर. वी. मार्ग, संघवी भुवन. | इ२ | २४१ |
| ३१. | | ५८ आनंदालय, रानडे रोड दादर [पश्चिम] | फग/उ | २४३ |
| ३२. | | ९१–९५ टेककर स्ट्रीट. | इ२ | २४५ |
| ३३. | | ४६७–४७२ आनंदजी लधा बिल्डींग, डॉ. बा. आंबेडकर मार्ग. | फग/द | २४७ |
| ३४. | | १९ ए डी. पी. वाडी वासकर चाळ. | इ१ | २४९ |
| ३५. | | ४५–४७ एम. अ. रोड, [लोखंडवाला बिल्डींग] | इ२ | २५१ |
| ३६. | | ३३१ अ. दोरी चाळ, अन. एम. जोशी मार्ग. | फग/द | २५३ |
| ३७. | | १२६ दामोदर निवास टी. एच. कटारीया मार्ग. माहिम. | फग/उ | २५५ |
| ३८. | | १७३ अ, सिध्दीकी बंगला, भवानी शंकर रोड. | फग/उ | २८३ |
| ३९. | | ५५–५७ हुजूरीया मार्ग, महमंदी बिल्डींग. | इ२ | २८५ |

सुधारीत

दक्षिण परिमंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ९९–१०१ एके.. मार्ग. | डी१ | २९९ |
| २. | २० आय. जे. एस. एस. रोड, हंसराज वाडी | डी१ | ३०५ |
| ३. | २० अनंतवाडी सिताराम पोद्दार मार्ग. | सी३–४ | ३०९ |
| ४. | १८१–१८३ डॉ. डी. एन. रोड. | अ | ३१७ |
| ५. | २१ केशवजी नाईक रोड. | ब | ३२५ |
| ६. | ९८ डी. ऑगस्ट क्रांती मार्ग | डी१ | ३२९ |
| ७. | ३६–३८ काकडवाडी गुरुकृपा | डी१ | ३३३ |
| ८. | ७२–८० जेल रोड, [पूर्व] | ब | ३५७ |
| ९. | २७६–२८४–फॉकलंड रोड | डी२ | ३६१ |

३८

| १. | २. | ३ | ४. |
|---|---|---|---|
| सुधारीत | | | |
| उत्तर परिमंडळ | | | |
| १०. | १२६ जे. बी. सिंग इस्टेट दादासाहेब फाळके मार्ग | फ/द | २९१ |
| ११. | १२६ सी. डी. सिंग इस्टेट दादासाहेब फाळके मार्ग | फ/द | २९५ |
| १२. | मोहमदी बिल्डींग क्र. १ डॉ. बा. आंबेडकर मार्ग | फ/द | ३१७ |
| १३. | २५६ सी शिवाई सेवा ट्रस्ट (जुनी मिरांजाचाळ, सेनाभवन पथ. | फ/उ | ३३७ |
| १४. | २९ झुबेदा मंझील डॉ. बी. जे. देवरुखकर मार्ग | फ/द | ३४५ |
| १५. | ३११–३२१ दिन बिल्डींग एन एम जोशी मार्ग. | फ/द | ३४९ |
| १६. | ११८ अ मानाजी राजूजी चाळ क्र. ५ सनमिल लेन. | फ/द | ३५३ |
| १७. | ९८–१०२ शंकर घुमोला मार्ग | इ२ | ३६५ |

पृष्ठ क्र. ५ वर सुधारणा — पुनर्रचित करणे व पुनर्बांधणी

पृष्ठ क्र. ९ वर सुधारणा — ११.३३ ऐवजी १.३३.

वरील सुधारणेसह कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला

२६/८/९३
सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

२६-८-९३
सभापती
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.